युरोपमधला ख्रिसमस : एक प्रवास अनुभव

लंडनच्या रस्त्यांवर फिरताना सध्या ख्रिसमसची तयारी जोरात सुरू आहे.
सगळीकडे लाईट्स, सुंदर विंडो डिस्प्ले, थंड हवा आणि लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद स्पष्ट दिसतो. हे सगळं पाहताना नकळत मला आपल्या भारतातील दिवाळीची आठवण झाली. घरातला उबदार प्रकाश, आकाशकंदील, पणत्या आणि सणाच्या दिवसांत घरात असलेली वेगळीच ऊर्जा मनात तरळून गेली.
युरोपमध्येही जवळजवळ तसंच वातावरण आहे.
देश वेगळा, सण वेगळा , पण आनंद व्यक्त करण्याची पद्धत खूपच ओळखीची वाटते. सगळीकडे लाईट्स, हसरी माणसं आणि "celebration mode" ऑन असलेलं दिसतं.
आज ख्रिसमस अगदी जवळ आला आहे.
फिरताना, पाहताना, अनुभव घेताना हातात पेन आलं आणि हे सगळं लिहावंसं वाटलं—माझ्या स्वतःच्या ट्रॅव्हल डायरीसाठी.
युरोपमध्ये ख्रिसमस हा फक्त धार्मिक सण नाही.
तो एक मोठा सामाजिक आणि कौटुंबिक उत्सव आहे. नोव्हेंबर डिसेंबर सुरू झाला की रस्ते, चर्च, चौक आणि बाजारपेठा सजायला लागतात. Nuremberg (Germany) किंवा Vienna (Austria) सारख्या शहरांमधली Christmas markets पाहणं म्हणजे ख्रिसमस खऱ्या अर्थाने अनुभवणं. लाकडी स्टॉल्स, रंगीत लाईट्स, स्थानिक खाद्यपदार्थ आणि हस्तकलेच्या वस्तूंमुळे संपूर्ण परिसर खूप जिवंत वाटतो..... सांगण्याचा मुद्दा हा की छोटी छोटी गावे शहरे गजबजून जातात .
खाद्यसंस्कृती हा ख्रिसमसचा एक महत्त्वाचा भाग आहे.

जर्मनीतील Stollen फ्रान्समधील Bûche de Noël, इटलीतील Panettone हे पदार्थ केवळ खाण्यासाठी नाहीत, तर परंपरेचा भाग आहेत. मुलांसाठी Santa Claus, गिफ्ट्स आणि Advent Calendar बनवणं हा खास आनंद असतो—जसा आपल्याकडे दिवाळीत किल्ला बनवण्याचा उत्साह असतो.
भारतामध्ये दिवाळीत जसं कुटुंब एकत्र येतं, नात्यांना वेळ दिला जातो, तसंच युरोपमध्ये ख्रिसमस हा कुटुंबासोबत घालवण्याचा सण आहे. एकत्र जेवण, संगीत, Prayers & एकमेकांसोबत शांत वेळ घालवणं याला इथे खूप महत्त्व आहे.
थंड बर्फाळ रस्त्यांवर चालताना चमकणारे लाईट्स, Drummist, ,Bands,Mulled Wine, Cranberry Sours आणि Tropical Coconut Rum Punch यांचा सुगंध सगळ्या अनुभवाला अजून खास बनवतो.
युरोपमध्ये ख्रिसमस अनुभवताना असं वाटतं की आपण फक्त प्रवास करत नाही आहोत, तर एका वेगळ्या संस्कृतीला जवळून पाहत आहोत. आणि त्याच वेळी, आपल्या दिवाळीसारख्या सणांची आठवण मनात आपोआप येते.
सण कुठलाही असो, भावना मात्र सगळीकडे सारख्याच असतात—आनंद, आपुलकी आणि एकत्र असण्याचा सुखद अनुभव.
तुम्हाला काय वाटतं?
प्रवासात कधी तुम्हालाही असे क्षण आले आहेत का, जिथे परदेशात असूनही आपल्या सणांची आठवण झाली?
तुमचा असा एखादा अनुभव कमेंटमध्ये नक्की शेअर करा—तुमच्या कथा वाचायला आवडेल 😊